नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक १२/०५/२०२२ (गुरूवार)**

**(सकाळ)**

---

## चोरी

**१) पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील इंडोल्को कंपनीसमोर डहाळी मौदा येथे दिनांक १०.०५.२२ चे १०.०० ते १९.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— अपुर्वा अनिलकुमार अवस्थी वय ३६ वर्ष, रा. भटवजमालपुर पोस्ट काकोरी लखनौव(मप्र) हे आपले रुमवर हजर असतांना त्यांच्याकडे लेबर लोकांचे पेमेन्ट करीता आनलेले १,३८,०००/—रु. चा मुद्देमाल व अन्य कागदपत्र सोबत राहनारा आरोपी नामे— केसीकाम याने चोरुन घेवुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास प्रशांत काळे मो.क्र ९८२२५४९६९६ हे करीत आहे.

**२) पो .स्टे. सावनेर** :— अंतर्गत श्रीकृष्ण मंगल कार्यालय येथे दिनांक ०९.०५.२२ चे १५.३० ते १६.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— सौ.रहिशा हरिचंद्र शेन्डे वय ३४ वर्ष रा. वार्ड कं.३ चनकापुर कॉलनी ही आपले भावाचे लग्न सोहळाला श्रीकृष्ण मंगल कार्यालय सावनेर येथे कुंटूबासह आली होती. लग्न सोहळा आटोपल्यानंतर नवरा नवरीचे सुलग्न सुरू असता ती नपरदेवाच्या बाजुला असलेल्या सोप्यावर बसली होती तिचे जवळ असलेली पर्स त्यामध्ये ६ ग्रॅम सोन्याची चैन एकुण १८ ग्रॅम सोने कि अंदाजे ४०,०००/—रू व रेडमी कंपनीचा नेट १० लाईट मोबाईल हॅन्ड सेट कि. ६०००/—रू. असा एकुण कि. ४६,०००/— रू. चा मुद्देमाल पर्समध्ये होता. ति पर्स तिने बाजुला सोप्यावर ठेवली होती ती पर्स वरिल मालासह अज्ञात आरोपीने स्वताचे आर्थिक फादयासाठी चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार यादव हे करीत आहे.

## फसवणुक

**पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत १.५ कि.मी अंतरावरील शिवाजी नगर कन्हान येथे दिनांक ०९/०५/२०२० चे १८.४५ वा. ते १९.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— तेजप्रकाश दिलहरण तिवारी वय ३४ वर्ष रा. शिवाजी नगर, कन्हान हे आपले घरी हजर असतांना त्यांना आरोपीने फोन वरुन म्हटले की, ‘मी ॲक्सीस बॅक मुंबइ येथुन बॅक अधिकारी बोलतो, तुमचे क्रेडीट कार्ड वर रिवॉर्ड पॉइट मिळाले आहे, तुम्ही जर ते युझ केले तर तुम्हाला गिफ्ट वॉउचर मिळेल’ असे आमिष दाखवुन फिर्यादीचे मोबाइल वर लिंक पाठवुन त्या लिंक ला ओपन करण्यास लावुन एक ओ.टी.पी आला. तो आरोपीस पाठविला असता फिर्यादीचे क्रेडीट कार्ड चे खात्यातुन ऑनलाईन पद्धतीने १,४४,९९५/—रु काढुन घेत फिर्यादीची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. सहकलम  अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री विलास काळे हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**१) पो.स्टे. मौदा** – दिनांक १०/०५/२०२२ चे १४.०० वा. चे सुमारास पो.स्टे. मौदा हद्दीत फिर्यादी यांची १६ वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला फिर्यादी कामा वरुन घरी आली असता मुलगी ही फोन वर बोलत होती तिला विचारले असता मोबाईल कुठून आला त्यावर ती हाताला झडका मारुन निघून गेली व परत आली नाही तिचा शोध घेतला असता ती मिळून आली नाही. अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून तिला पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री सतिश सोनेकर मो.क्र. ८९७५९२१७७० हे करीत आहे.

**२) पो.स्टे. मौदा** – दिनांक १०/०५/२०२२ चे ०८.०० वा. ते १०.०० वा. चे सुमारास पो.स्टे. मौदा हद्दीत फिर्यादी यांची १६ वर्षीय अल्पवयीन मुलगी ही फोनवर बोलत होती. फिर्यादी यांनी मुलीला म्हटले की, 'नेहमी फोनवर का बोलतेस आता मोबाईल ठेव' यावरून फिर्यादीची मुलगी तिला काही न सांगता निघून गेली. गावात तिचा शोध घेतला असता ती मिळून आली नाही. अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून तिला पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास मेश्राम मो.क्र. ९४२३२१९४२९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**